निगराणी

# कीड व्यवस्थापनासाठी निंबोळी अर्क उपयुक्त



प्रत्येक हंगामामध्ये विविध किडींच्या प्रादुर्भावामुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. तसेच या किडींच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या रासायनिक कीटकनाशकांमुळे संबंधित सर्वांनाच अनेक दुष्परिणामांना सामोरे जावे लागते. यावर शाश्वत उपाययोजना म्हणजे जैविक कीटकनाशकांचा वापर वाढविणे होय; याकरिता कडुनिंब हा सोपा पर्याय आहे.




**डॉ. फरिया खान**
(मो.नं. ८७८८८५३९८०)
**डॉ. संजीवन बटेवाड**
**डॉ. बस्वराज भेदे**
कृषी कीटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी


कडुनिंबाच्या बियांमध्ये अनेक रासायनिक घटक असून त्यातील अझाडिरॅक्टिन, निंबिन, निंबोडिन, निंबोनिन, निंबिस्टेलॉल, मेलॅट्रियाल हे महत्त्वाचे घटक आहेत. त्यामुळे मित्रकीटकांचे आणि पर्यावरणाचे संवर्धन होते. मित्रकीटकांद्वारे जैविक कीड व्यवस्थापनही साध्य होते.

**निंबोळी अर्काचा कीटकांवर परिणाम**

* अंशत: किंवा पूर्णपणे अंडी घालण्यात अयशस्वी. * प्रौढाचा जीवनक्रम कालावधी कमी. * अंडी घालण्यापासून मादीस परावृत्त करतो. * अंडी उबवण्यावर परिणाम होतो. * भक्षणरोधक आहे. * कीटकांची अळी अवस्थाच कायम राहते. * कात टाकण्यास प्रतिबंध होतो.



**निंबोळी अर्क तयार करण्याची पद्धत**

* निंबोळीच्या बिया जमा कराव्यात.

* त्या वाळवून स्वच्छ कराव्यात. वाळलेल्या बिया दळून त्यांची जाडसर भुकटी करून साठवून ठेवावी.

* फवारणी करण्याच्या अगोदरच्या रात्री ५ किलो भुकटी कापडामध्ये बांधून १० लिटर पाण्यात रात्रभर भिजवून ठेवावी.

* दुसऱ्या दिवशी सकाळी कापडातील निंबोळीच्या बियांच्या भुकटीतील अर्क पिळून काढावा.

* त्यानंतर त्या अर्कात दुसरे ९० लिटर पाणी मिसळून ५ टक्के तीव्रतेचे एकूण १०० लिटरचे द्रावण तयार होईल.

* हा निंबोळी अर्क पानावर योग्य रितीने पसरावा व टिकून राहावा यासाठी २०० ग्रॅम कपडे धुण्याचा सोडा किंवा साबण वरील द्रावणात मिसळून ढवळावा. त्यानंतर हे द्रावण फवारणीसाठी वापरावे.

* वरीलप्रमाणे फवारणीसाठी १०० लिटरचे द्रावण तयार होते. फवारणीसाठी लागणारे एकूण द्रावण यानुसार निंबोळीच्या बियांच्या भुकटीचे व पाण्याचे प्रमाण घ्यावे.

**निंबोळी अर्क फवारणीचे फायदे**

* कडुनिंबाच्या झाडामध्ये असलेले 'अॅझाडिरॅक्टिन' कीटकनाशकाचे काम करते. या घटकाचे प्रमाण याच्या बियांमध्ये जास्त प्रमाणात असते.

* या निंबोळ्यांपासून तयार केलेल्या अर्काचा पिकांवरील बऱ्याच किडींवर योग्य तो परिणाम होतो.

* मावा, अमेरिकन बोंड अळ्या, तुडतुडे पाने पोखरणाऱ्या व देठ कुरतडणाऱ्या अळ्या, कोबीवरील अळ्या, फळमाश्या, लिंबावरील फुलपाखरे, खोडकिडा आदी अनेक किडींवर याचा प्रभाव पडतो व त्यांचा बंदोबस्त होतो.

* निंबोळी अर्काच्या फवारणीमुळे रसशोषक किडींचा प्रादुर्भाव कमी होतो.

* सर्व प्रकारच्या पिकांवर १५ दिवसांच्या अंतराने नियमित फवारणी घेतल्यास रसशोषक किडींच्या जीवनचक्रात अडथळा येऊन किडींचे नियंत्रण होते.

* किडींच्या जीवनचक्रामध्ये पतंगवर्गीय किडींना अंडी घालण्यापासून परावृत्त केले जाते.

* तसेच रसशोषक किडींच्या अंडी घालण्याच्या नैसर्गिक क्रियेमध्येही अडथळा येतो. त्यामुळे एकूणच जीवनचक्रामध्ये खंड पडून नियंत्रण साध्य होते. ■